# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२-२२६११०१५

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai - 400 001 Website: www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२-२२६११०१५


दि.१४/११/२०२२

क्र. मराशुवपशिमं/निकाल/५८११/२०२२

प्रति,
प्राचार्य/परिचर्या अधिकारी/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्न परिचारीका प्रशिक्षण संस्था,

विषय: - दोन दिवसाची मुदतवाढ - द्वितीय वर्ष जी.एन.एम.रेग्युलर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ जी.एन.एम. द्वितीय वर्ष कोर्स नियमित परिक्षेसाठी विद्यार्थ्याचे ऑनलाईन पध्दतीने अर्ज, परीक्षा शुल्क भरण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व संलग्नीत महाविद्यालयातील संस्थाप्रमुख व प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ जी.एन.एम. द्वितीय वर्ष कोर्स नियमित परिक्षेसाठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने ऑनलाईन परीक्षा फॉर्म उपलब्ध केलेले होते. बऱ्याच संस्थांचे परीक्षा फॉर्म भरण्याबाबतचे पत्र मेल द्वारे प्राप्त् झालेले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवुन महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळामार्फत ऑनलाईन परिक्षा शुल्क भरण्यासाठी दिनांक १५/११/२०२२ ते १६/११/२०२२ मध्य रात्री १२.०० वाजेपर्यंत लिंक सुरु करण्यात येत आहे याची सर्व संस्थाप्रमुख व प्राचार्यांनी नोंद घ्यावी. विहित कालावधीत वरील बाबी पूर्ण न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी संस्था जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

विद्यार्थी परीक्षा नोंदणी (Student Exam Enlloment) २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी Student Exam Enrlloment साठी वापरण्यात आलेल्या User ID व Password वापरण्यात यावा. विद्यार्थ्यांचा पी.आर.एन. क्रमांक टाकून विद्यार्थी परिक्षा नोंदणी करावी.

विद्यार्थी परिक्षा अर्ज (Online Exam Application)- विद्यार्थी परिक्षा नोंदणी झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने पी.आर.एन. क्रमांक टाकून अर्ज करावयाचे आहेत.

परिक्षा शुल्क दिनांक १५/११/२०२२ ते १६/११/२०२२ पर्यंत भरण्यात यावे. शुल्क भरताना खालील पध्दतीचा अवलंब करावा. परिक्षा शुल्क भरण्याबाबत - परिक्षा शुल्क भरण्यासाठी पेमेंट मेन्यु मध्ये जाऊन Pay online (Blue Button) वरती क्लिक करुन payment करावे. NEFT/RTGD/DD या पध्दतीने केलेले परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही. याची सर्व संलग्नीत संस्थानी नोंद घ्यावी.

अंतर्गत टर्म नुसार मुल्यमापन गुणांची नोंदणीबाबत - सदर परिक्षेसाठी फ्रेशर ( म्हणजेच जुन्या बॅचचे असे विद्यार्थी ज्यांनी सदर परिक्षा दिली नाही) असणाऱ्या विद्यार्थ्यांचे टर्म १ व टर्म २ अंतर्गत मुल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक २२/११/२०२२ ते २५/११/२०२२ पर्यंत करण्यात यावी.

अंतिम अतंर्गत मुल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक २६/११/२०२२ ते २७/११/२०२२ पर्यंत करावी. विहीत कालावधी वरील बाबी पुर्ण न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्था जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

टिप : काही अडचणी असल्यास पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा - ८९७६२७९९३१

प्रबंधक

महाराष्ट्र राज्य शुशुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत

१. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुशुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
२. मा. विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य शुशुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.